दै. देशोन्नती दि.31.01.2022



देशोन्नती 31-01-2022

क्राइम-न्यायालयातून

# ऑनलाईन मटक्यावर धाड; गुन्हा दाखल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ माहूर तालुक्यातील वाईबाजार येथे खेळल्या जात असलेल्या फन टारगेटस्किल नावाच्या ऑनलाइन मटक्यावर सिंदखेड पोलिसांनी २९ जानेवारी रोजी धाड टाकली. या धाडीत २१ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोना गजानन कुमरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**देशी दारू पकडली**

विनापरवाना देशी दारू बाळगून विक्री करणाऱ्यास स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने २९ जानेवारी रोजी ताब्यात घेतले. बाफना टी पॉईंट ते देगलूर नाका मार्गावर केलेल्या या कारवाईत २ हजार ६०० रुपये किंमतीची देशी दारू जप्त केली. याप्रकरणी अफजल खान महेमुदखान यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**विदेशी दारू पकडली**

विनापरवाना चोरट्या मार्गाने विक्री करण्यासाठी देशी, विदेशी दारू बाळगणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २९ जानेवारी रोजी ताब्यात घेतले. पिंपळगाव निमजी येथील आरोपीने त्याच्या घराच्या बाजूला झाडाखाली दारूची विक्री करीत होता. त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले ४ हजार २०० रुपये किंमतीची दारू जप्त केली. याप्रकरणी पदमसिंह कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**विदेशी दारू पकडली**

तरोडा नाका ते मालेगाव मार्गावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत विनापरवाना विदेशी दारूची विक्री करणाऱ्यास २९ जानेवारी रोजी ताब्यात घेतले. त्याच्याकडून १० हजार ४०० रुपये किंमतीची विदेशी दारू जप्त केली. याप्रकरणी गंगाधर कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**गावठी दारू पकडली**

मुदखेड तालुक्यातील खूजडा शिवारात चिल पिंप्री फाट्याजवळ पोलिसांनी कारवाई करून गावठी दारू विक्री करणाऱ्यास २९ जानेवारी रोजी ताब्यात घेतले. यामध्ये पोलिसांनी १ हजार २०० रुपये किमतीची गावठी दारू जप्त केली. याप्रकरणी पोहेकॉ मधुकर पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुदखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**पाण्यात बुडून मृत्यू**

एका इसमाचा पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याची घटना ३ जानेवारी रोजी घडली. गौतम नागोराव नरवाडे (४५) रा. बारड ता. मुदखेड असे मयताचे नाव आहे. तो फिरायला जातो म्हणून घराबाहेर पडला होता. दरम्यान दुकानासमोरील प्लास्टिक बेराल मध्ये हात धुण्यासाठी गेला असता तोल जाऊन पडल्याने पाण्यात बुडूनत्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी संतोष नरवाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बारड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

दै. लोकमत दि. 31.01.2022

दै. लोकमत दि. 31.01.2022

# इतवारा पोलिसांनी दोन चोरटे केले जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील मिल्लतनगर येथील एका दुकानातील चोरी प्रकरणी इतवारा पोलिसांनी दोघा जणांना अटक केली आहे. डीबी पथकाने ही कारवाई पार पाडली.

जुन्या नांदेडातील मिल्लतनगर येथे ५ जानेवारी रोजी आमेर खान अय्युब खान यांच्या दुकानातून रोख १८ हजार, प्रिंटर आणि मोबाईल असा एकूण ५१ हजार रूपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला होता. या प्रकरणाचा तपास इतवारा पोलिसांकडे होता. इतवारा ठाण्यातील डीबी पथक प्रमुख जी.ए. गोटके, पोहेकॉ. वाकडे, कस्तुर, दासरवार, चाऊस, हंबर्डे, कलंदर आदींनी चोरी प्रकरणात महमद मुजीबखान ऊर्फ बटन महंमद रिजवान खान, महमद सलमान महंमद अयुब या दोघांना अटक केली.

त्यांच्याकडून रोख ९ हजार ७००रूपये, एक मोबाईल, प्रिंटर असा एकूण ३२ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोनीही आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.